# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

### माहिती कक्ष, दि १३ जून २०२३

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३०४/२०२३ भादवि ३८०,४५४,४५७ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | मार्च २०२१ ते मे २०२३ चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर ७४८, पश्चिम मंगळवार पेठ, टिळक चौक, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १३/०६/२०२३ रोजी १३.१८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सौ. तारा गिरीष चंडक, वय- ८२ वर्षे, रा. ७४८, पश्चिम मंगळवार पेठ, टिळक चौक, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १) ४,००,०००/- रु आठ पिळयाच्या अंगठया प्रत्येकी १ तोळे वजनाच्या<br>२) ७,५०,०००/- रु ५ सोन्याचे चैन प्रत्येकी ३ तोळे वजनाचे असे एकुण १५ तोळे<br>३) ४,००,०००/- रु आठ सोन्याचे बांगडया प्रत्येकी १ तोळे वजनाच्या<br>४) १,२५,०००/- रु एक सोन्याचा नेकलेस २.५ तोळे वजनाचा<br>५) ४०,०००/- रु दोन एन बी आर कंपनीचे कार्ड मध्ये पॅक असलेले प्रत्येकी ४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कॉईन<br>६) १०,०००/- रु एक एन बी आर कंपनीचे कार्ड मध्ये पॅक असलेले २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कॉईन<br>७) ३०,०००/- रु तीन नारोनदास कंपनीचे कार्ड मध्ये पॅक असलेले २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे बिस्कीट<br>८) १०,०००/- रु अंदाजे ०२ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन<br>९) १०,०००/- रु अंदाजे ०२ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन व त्यामध्ये सोन्याचे बदाम असलेले<br>१०) १०,५००/- रु एक व्हिक्टोरीया राणी व इंग्लंडचा राजा यांचे छाप असलेले १५ तोळे वजनाचे चांदीचे बिस्कीट<br>११) ७,०००/- रु एक राधाकृष्ण यांचे छाप असलेले १० तोळे वजनाचे चांदीचे बिस्कीट<br>**एकुण- १७,९२,५००/- रुपये असे** |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, अंदाजे मार्च २०२१ मध्ये होळी सणाकरीता फिर्यादी यांनी फिर्यादीचे बेडरुममध्ये असलेली तिजोरी उघडुन तिची साफसफाई केली होती. त्यावेळी फिर्यादीचे सर्व दागिने तिजोरीत असल्याचे फिर्यादी यांनी पाहिले होते. तसेच सन- २०२२ मध्ये राखी पोर्णीमेच्या वेळेस फिर्यादी या औरंगाबाद येथे सात ते आठ दिवसाकरीता फिर्यादीच्या भावाकडे गेल्या होत्या. त्यावेळी फिर्यादीचे पती घरीच होते. त्यानंतर २५/०३/२०२३ रोजी फिर्यादी व फिर्यादीचे पती असे दोघे मिळुन फिर्यादीचे रायपुर येथील मुलीकडे गेले होते. त्यावेळी तेथे महिना भर राहिले होते.<br>फिर्यादी व फिर्यादीचे पती असे दोघे मिळुन दि. २३/०४/२०२३ रोजी रायपुरहुन परत सोलापूर येथे आले असता, फिर्यादी ज्या वेळेस रायपुर येथे गेले होते त्यावेळी श्रीनिवास पगडीमल यांस घराकडे लक्ष देण्यास सांगितले होते. त्यामुळे तो नेहमी प्रमाणे घरी झोपण्याकरीता येत होता. मे- २०२३ महिन्याचे शेवटच्या आठवडयात फिर्यादीने तिजोरी उघडुन पाहिली असता, तिजोरीमध्ये ठेवलेले फिर्यादीचे सोन्याचे व चांदीचे दागीने दिसुन आले नाहीत त्यामुळे फिर्यादी व फिर्यादीचे पती असे दोघांनी मिळुन घरातील ४ मोलकरीण व श्रीनिवास पगडीमल असे सर्वांना दागिनेबाबत विचारले असता त्या सर्वांनी त्यांना त्याबाबत माहिती नसल्याचे सांगितले. त्यामुळे फिर्यादीची खात्री झाली की मार्च २०२१ ते मे- २०२३ या कालावधीत कोणीतरी अज्ञात इसमाने डयुप्लीकेट चावीचा वापर करुन, तिजोरीतील वरील वर्णनाचा ऐवज चोरुन नेला आहे म्हणून.<br>तपास:- सपोनि/ पवार - ९८८१९०२६२४ |